# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सभा दिनांक ०५/०६/२०२३

---

## कार्यवृत्त

आज दिनांक ०५/०६/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम, पाणीपुरवठा, वृक्ष, शिक्षण व प्रकल्प विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

| अ.क्र | विषय |
|---|---|
| | बांधकाम विभाग |
| १ | प्र. क्र. ७ मध्ये अशपाक लोकल ते मरी माता मंदिरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे |
| २ | मलकापूर न.प. हद्दीतील प्र. क्र. १४ मध्ये विकास कामे करण्याबाबत |
| ३ | मा. आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२३-२४ अंतर्गत प्र. क्र. ८ मधील करावयाच्या कामांबाबत |
| | पाणीपुरवठा विभाग |
| ४ | मलकापूर शहर पाणीपुरवठा योजना प्रस्ताव अमृत 2.0 केंद्रशासन पुरस्कृत योजनेअंतर्गत शासनाकडे सादर करणेबाबत |
| | वृक्ष विभाग |
| ५ | नगरपरिषद मलकापूर अंतर्गत वृक्ष लागवड व संगोपन करणे बाबत |
| | शिक्षण विभाग |
| ६ | मौ. आझाद न.प. उर्दू हायस्कूल मलकापूर येथे रिक्त वर्ग ९ ते १० च्या अनुदानित जागेवर श्री आयाज अहमद खान लियाकत खान (२५% पदवीधर सहा. शिक्षक) मौ. आझाद न.प. उर्दू हायस्कूल यांची संवर्ग बदल दि. ०१/०३/२०२३ पासून उच्चश्रेणी सहा. शिक्षक (यु.टी.डी.) म्हणून नियुक्ती करणे बाबत. |
| | प्रकल्प विभाग |
| ७ | दीनदयाल अंत्योदया योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत मल्टी टास्किंग ऑफिसर यांची तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पद्धतीने नेमणूक करणे बाबत. |

---

**विषय क्र.१ :- प्र. क्र. ७ मध्ये अशपाक लोकल ते मरी माता मंदिरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मा. आमदार श्री राजेश पंडितराव एकडे यांचे पत्र क्र.विपस/M/७३१/२०२३ दि. ३१/०३/२०२३ नुसार नगर परिषद

हद्दीतील प्र. क्र. ७ मध्ये अशपाक लोकल ते मरीमाता मंदिर पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे या कामाबाबत सुचविले असल्याचे नमूद केलेले आहे. त्यानुसार सदरचा रस्ता हा अतिशय खराब झाला असून बऱ्याच वर्दळीचा रस्ता आहे तसेच नालीचा भाग बऱ्याच ठिकाणी शिकस्त झालेला असून कोसळून पडला आहे. त्यामुळे रहदारीस अडचण निर्माण होऊन नालीद्वारे पाण्याचा योग्यरित्या निचरा होण्यास अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे सदर रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न.प. निधी अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र. २ :- मलकापूर न.प. हद्दीतील प्र. क्र. १४ मध्ये विकास कामे करण्याबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मा. जिल्हा प्रशासन अधिकारी नगर विकास शाखा बुलढाणा यांचे दूरध्वनी संदेशानुसार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत विकास कामांचे प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले असून करावयाची विकास कामे खालील प्रमाणे.

१) प्रभाग क्र. १४ मध्ये सर्वे नं. २४८ ओपन स्पेस मध्ये कंपाउंड वॉल करणे, नाली व रोड बांधणे पेव्हिंग ब्लॉक बसविणे.

२) प्रभाग क्र. १४ माता महाकाली नगर मध्ये भीम नगर पासून ते लक्ष्मण हिरु चव्हाण वैकुंठ धाम पर्यंत रस्त्याचे दोन्ही बाजूला पेविंग ब्लॉक व सिमेंट कॉंक्रीट नाली बांधकाम करणे.

त्यामुळे उपरोक्त कामांचे प्रस्ताव सादर करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र.३ :- मा. आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२३-२४ अंतर्गत प्र. क्र. ८ मधील करावयाच्या कामांबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेला अहवालानुसार मा. जिल्हा नियोजन अधिकारी जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा यांचे पत्र क्र.जिनिस/आस्थाविका/सांस/४१७/२०२३ दि. ३१/०५/२०२३ अन्वये मा. आमदार श्री राजेश एकडे मलकापूर विधानसभा मतदारसंघ यांचे निधीतून करावयाच्या न.प. हद्दीतील प्र. क्र. ८ ताज नगर येथे चांदभाई यांचे घरापासून ते रउफभाई यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे व नालीचे बांधकाम करणे याबाबत संपूर्ण प्रस्ताव सादर करण्यास सुचविले असल्याचे नमूद केलेले आहे. त्यामुळे सदर कामाबाबत प्रस्ताव सादर करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२३-२४ अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.४ :- मलकापूर शहर पाणीपुरवठा योजना प्रस्ताव अमृत 2.0 केंद्रशासन पुरस्कृत योजनेअंतर्गत शासनाकडे सादर करणेबाबत.**

राज्य शासन मंत्रिमंडळ बैठक दिनांक १४/०७/२०२२ मध्ये राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीत केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 (Atal Mission For Rejuvenation & Urban Transformation 2.0) राबविण्याचा महत्त्वकांक्षी निर्णय

घेण्यात आलेला आहे. या अभियानात १.मल निसारण प्रकल्प २.सांडपाणी पुनर्वापर व पुनर्प्रक्रिया प्रकल्प ३.जलसाठ्याचे पुनरुज्जीवन प्रकल्प ४.हरित क्षेत्र प्रकल्प या अभियानात राज्यातील शहरे पाणीपुरवठा बाबत स्वयंपूर्ण करणे आहे.

अमृत 2.0 अभियान हे कागद विरहित असून या शहराच्या पाण्याचा ताळेबंद (City water balance plan), शहर जल कृती आराखडा (City water Action Plan) ऑनलाईन पद्धतीने amrut.mohua.gov.in या संकेतस्थळ वर सादर करणे बंधनकारक असून राज्य उच्च अधिकारी सुकाणू समिती यांच्या मान्यतेनंतर केंद्रीय सचिव गृहनिर्माण व नागरी विकास मंत्रालय यांच्या अध्यक्षतेखालील गठित शिखर समिती ऑनलाईन पद्धतीने सादर करण्यात येईल.

अमृत 2.0 अभियान अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापक नेमणूक करण्याची स्थानिक स्वराज्य संस्थांना मुभा असून त्यांना कमाल 3% शुल्क अदा काढण्याचे मुभा देण्यात आलेली आहे. सदर योजनेचा वित्तीय आकृतीबंध व वर्ग नगरपालिका साठी केंद्र हिस्सा 50% राज्य हिस्सा 45% व स्वहिस्सा 10% असा आहे.

शासन परिपत्रक क्र. अमृत-2022/प्र.क्र.२०३/नवी-303 दिनांक 16/09/2022 नुसार प्रकल्प व्यवस्थापक नेमणूक करणे गरजेचे आहे. परिच्छेद 4 नुसार सदर कामाची कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे.

उपरोक्त अभियान सुरू असेपर्यंत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत प्रकल्पास मान्यता न देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. मलकापूर शहर पाणीपुरवठा अंदाजपत्रक यापूर्वी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत तयार करण्यात आलेले असून ते अमृत 2.0 अभियान सुरू झालेले असल्यामुळे शासन निर्णय क्रमांक अमृत-2022/प्र.क्र 141/नवी-33 मंत्रालय मुंबई 400032 दिनांक 14/07/2022 ची अंमलबजावणी करणे व त्यानुसार प्रस्ताव तयार करणे योग्य राहील तसेच उपरोक्त शासन निर्णय मधील तरतुदीनुसार लोकवर्गणी अनुज्ञेय शासकीय निधी, स्व निधीतून भरण्यास व आवश्यक त्या सुधारणा स्वीकृत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.५ :- नगरपरिषद मलकापूर अंतर्गत वृक्ष लागवड व संगोपन करणे बाबत.**

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये नगरपरिषद मलकापूर हद्दीमध्ये एकूण ३००० वृक्ष लागवड करणे क्रमप्राप्त आहे. तरी नगरपरिषद तर्फे वृक्ष लागवड केल्यानंतर संगोपन करणे किंवा संगोपणासाठी कंत्राट दिल्यास कंत्राटदारावर देखरेख ठेवण्यास आवश्यक मनुष्य उपलब्ध नसल्याने शहरातील नागरिकांमध्ये पर्यावरणाप्रती जिव्हाळा निर्माण करण्याकरिता व शाश्वत पर्यावरण करिता जे नागरिक, नागरिक समूह अथवा सेवाभावी संस्था अथवा संघटना स्वयंसेवक म्हणून नगरपरिषद तर्फे लागवड केलेल्या रुक्ष ज्यास नगरपरिषद मार्फत नियमित पाणी देण्याचे सोय सुद्धा केली जाईल व आवश्यकता भासल्यास ट्री-गार्ड पुरवण्यात येईल त्या वृक्षास जगवण्याची जबाबदारी घेण्यास तयार असतील त्यांच्याकडून तशी लेखी हमी घेऊन ते वृक्ष त्या लोकांना दत्तक देता येईल.

वरील प्रमाणे वृक्ष दत्तक घेण्यासाठी जाहीर सूचना देऊन आवेदन मागवावे लागतील व ३००० पेक्षा कमी वृक्षांसाठी आवेदन प्राप्त झाल्यास उर्वरित वृक्षासाठी संगोपनाची जबाबदारी सुद्धा कंत्राटदारास द्यावी लागेल. त्याचप्रमाणे सदर कामासाठी 14 ट्रीज फाउंडेशन या सामाजिक संस्थेतर्फे विनामूल्य वृक्षरोपण मिळवण्याकरिता पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. तथापि त्यांच्याकडे उपलब्ध वृक्षरोपे आपल्याला हव्या असलेल्या प्रगती व

दर्जाची नसल्यास सामाजिक वनीकरण विभागाकडून शासकीय दरांमध्ये विकत घ्यावे लागतील. तरी उपरोक्त प्रमाणे वृक्ष लागवड व संगोपन व इतर अनुषंगिक कामे करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च वृक्ष निधी अथवा नगरपरिषद उपलब्ध निधीमधून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.६ :- मौ. आझाद न.प. उर्दू हायस्कूल मलकापूर येथे रिक्त वर्ग ९ ते १० च्या अनुदानित जागेवर श्री आयाज अहमद खान लियाकत खान (२५% पदवीधर सहा. शिक्षक) मौ. आझाद न.प. उर्दू हायस्कूल यांची संवर्ग बदल दि. ०१/०३/२०२३ पासून उच्चश्रेणी सहा. शिक्षक (यु.टी.डी.) म्हणून नियुक्ती करणे बाबत.**

नगरपरिषद मलकापूर द्वारा संचालित मौ. आझाद न.प. उर्दू हायस्कूल मलकापूर जिल्हा बुलढाणा या शाळेतील मुख्याध्यापक श्री शेख साबीर शेख लाल यांची दि. २८/०२/२०२३ रोजी सेवा निवृत्ती होऊन दि. ०१/०३/२०२३ रोजी मौ. आझाद न.प. उर्दू हायस्कूल मधील वर्ग ९ ते १० वर कार्यरत शिक्षक श्री शेख हाफिज शेख आयुब शालेय शिक्षक यांची मुख्याध्यापक म्हणून पदोन्नती करण्यात आली. त्यामुळे सदर शाळेत वर्ग ९ ते १० ची अनुदानित जागा रिक्त आहे. त्यामुळे सदर शाळेत वर्ग ६ ते ८ वर निम्न श्रेणी पदवीधर सहा. शिक्षक म्हणून सेवेत कार्यरत असलेले श्री अयाज अहमद खान लियाकत खान यांची दि. ०१/०२/२००५ रोजी सदर शाळेत नियुक्ती होऊन नियुक्तीच्या तारखेपासून या शाळेत सलग सेवेत कार्यरत आहेत. तसेच त्यांचे शैक्षणिक पात्रता बी.ए बी.एड असून रिक्त झालेल्या वर्ग ९ ते १० च्या अनुदानित जागेवर श्री अयाज अहमद खान लियाकत खान यांची संवर्ग बदलाने दि. ०१/०३/२०२३ पासून उच्च श्रेणी सहा. शिक्षक (यु.टी.डी.) म्हणून नियुक्ती करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.७ :- दीनदयाल अंत्योदया योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत मल्टी टास्किंग ऑफिसर यांची तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पद्धतीने नेमणूक करणे बाबत..**

उपरोक्त विषयास अनुसरून प्रकल्प अधिकारी यांनी सादर केलेला अहवालानुसार DAY-NULM चे सहा घटक असून प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना व महिला बालकल्याण तसेच इत्यादी घटकांमध्ये मनुष्यबळांची कमतरता असून दीनदयाल अंत्योदया राष्ट्रीय नागरिक उपजीविका अभियाना अंतर्गत मल्टी टास्किंग ऑफिसर्स यांची तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्याची तरतूद असल्याचे नमूद केलेले आहे, त्यामुळे उपरोक्त मल्टी टास्क ऑफिसर्स यांची तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पद्धतीवर नियुक्ती करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च DAY-NULM अंतर्गत CBT घटकातून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**आर यु सुरडकर**
**प्रशासक**
**नगरपरिषद मलकापूर**